ISSN: 2278-4632
Vol-10 Issue-5 No. 2 January–December 2020

# उस्मानाबाद जिल्ह्यातील पिक प्रारूपातील बदलांचा भौगोलिक अभ्यास

**डॉ सुभाष माणिकराव गायकवाड**
सहाय्य्क प्राध्यापक
मा. ह. महाडीक महाविद्यालय मोडनिंब
Email- Subhash25gaikwad@gmail.com
Mob No- 7020427272

**प्रस्तावना :**

शेती हा मानवी जीवनातील महत्वाचा व्यवसाय आहे.कारण भारत हा कृषि प्रधान देश आहे. महाराष्ट्र राज्यातील उस्मानाबाद हा जिल्हा त्याचाच एक भाग आहे. अन्न,वस्त्र ,निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. या गरजा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शेतीमधून पूर्ण होतात. विशेष म्हणजे शेतीवर जमिनीचा परिणाम होतो. उस्मानाबाद जिल्हा दख्खनच्या पठारावरील एक महत्वाचा जिल्हा आहे . दख्खनच्या पठारावरील जमीन रेगुर प्रकारची आहे . रेगुर जमीन सुपीक असल्याने काही अपवाद वगळता जिल्ह्यात बहुतेक शेती लहरी पावसावर अवलंबून असते. म्हणून जिल्ह्यातील शेतकरी अन्नधान्य पिकाबरोबर कडधान्ये,गळीत धान्य पिकांचे उत्पादन घेतले जाते. प्रस्तुत शोध निबंधासाठी उस्मानाबाद जिल्हयातील १९९५-९६ ते २०१०-११ या काळातील पिकाखालील क्षेत्राचा आढावा घेण्यात आला आहे .

**गृहितके :**

- पिक प्रारूपात बदल होत आहे.
- जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कल नगदी पिकाकडे वाढत आहे.

**बीजसंज्ञा :** *पिकाखालील क्षेत्र , कालपरत्वे बदल*

**अभ्यासक्षेत्र :**

उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्राच्या दक्षिनेस व मराठवाड्याच्या नैऋत्येला आहे. हा जिल्हा समुद्रसपाटीपासून ६००मी.उंचीवर असून पूर्णता: दख्खनच्या पठारात येतो. उस्मानाबाद जिल्हाचा अक्षवृत्तीय विस्तार १७$^{0}$ ३५पूर्व उत्तर ते १५$^{0}$40 उत्तर अक्षाश आणि रेखावृत्तीय विस्तार 75$^{0}$१६ पूर्व ते ७६ $^{0}$४०रेखावृत्त आहे. उस्मानाबादच्या नैऋत्येला सोलापूर जिल्हा ,वायव्येला अहमदनगर जिल्हा ,उत्तरेला बीड जिल्हा ,पूर्वेला लातूर जिल्हा व दक्षिणेला कर्नाटकातील बिदर व गुलबर्गा हे जिल्हे आहेत. जिल्ह्याचा बहुतांश भाग खडकाळ व उर्वीरित भाग सपाट आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७५१२.४ चौ.कि.मी आहे. या पैकी शहरी भागाचे क्षेत्रफळ २४१.४ चौ.कि.मी आहे .जिल्ह्यातून मांजरा व तेरणा नद्या वाहतात .


Copyright © 2020 Authors

उस्मानाबाद जिल्ह्याचे हवामान कोरडे आहे . जिल्ह्यात सरासरी ६००ते ७००मिलिमीटर पाऊस पडतो.तो जुन ते सप्टेंबर या कलावधीत ऑक्टोबर ते नोव्हेंबर काळात हवामान दमट असते . डिसेंबर ते जानेवारीत हवामान थंड असते .मध्य फेब्रुवारी ते जूनपर्यंत हवामान कोरडे असते .२०११च्या जनगननेनुसार जिल्ह्यात १६६०३११लोक राहतात.

**उद्देश :**

१. उस्मानाबाद जिल्ह्यातील पिक प्रारूपातील ब उस्मानाबाद जिल्ह्यातील पिक प्रारूपातील स्थल-कालानुसार अभ्यास करणे.

२. पिक प्रारूपातील बदलाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**माहिती स्त्रोत :**

सदर शोधनिबंध द्वितीयल स्वरुपाच्या आकडेवारीवर आधारलेला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील पिक प्रारूपातील बदलाचा अभ्यास करण्यासाठी उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन , कृषि अधिकारीअहवाल सांखिकीय विभागाचा अहवाल, विकिपीडिया ईत्यादी साधन सामुग्रीचा आधार घेऊन १९९५-९६ २०१०-११ हा कालावधी सदर शोध निबंधासाठी निवडलेला आहे.

**अभ्यास पद्धती :**

उपलब्ध आकडेवारीचे संकलन करून टक्केवारीच्या आधारे सांखिकीय पद्धतीद्वारे विविध पिकाखालील क्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्याच्या नकाशावर जोड स्तंभालेखाच्या आधारे दाखविण्यात आले आहे.

**विषय विवेचन :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. जिल्ह्यात जलसिंचनाचा म्हणावा तसा विकास झालेला नसल्यामुळे आधीकांश लोकांची शेती पावसावर अवलंबून आहे. तेथे ऊस, द्राक्षे, या सारखी नगदी पिकांचे उत्पादन घेतले जाते. परंतु त्याचे क्षेत्र अल्प आहे.

**उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध पिकाखालील क्षेत्र(टक्केवारीत)**

| अनु. क्र. | क्षेत्र | वर्ष | | | | बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९५-९६ | २०००-२००१ | २००५-२००६ | २०१०-२०११ | १९९१-९६ ते २०१०-२०११ |
| १. | कडधान्य पीकाखालील | १७.९२ | १८.१६ | १९.०३ | २०.११ | २.१९ |

 Copyright © 2020 Authors

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | अन्नधान्य पीकाखालील | ५३.९६ | ५५.९६ | ५७.३४ | ६०.५१ | १.५५ |
| ३ | नगदी पीकाखालील | ०१.७७ | ०२.१८ | ०३.१० | ०४.३८ | २.६१ |
| ४ | फळे व भाजीपाला पीकाखालील | ०.९४ | ०१.०० | ००.९२ | ००.९४ | ०० |
| ५ | तेलबिया पीकाखालील | २०.११ | २२.७० | १९.११ | १४.०६ | -६.३५ |
| ६ | एकूण | १०० | १००.० | १००.० | १००.० | |

स्त्रोत : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, उस्मानाबाद १९९५-९६ ते २०१०-२०११.

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की सन१९९५-९६ते २०१०-११ या कालावधीतील असून ती विविध पीकाखालील दर्शविते. सन१९९५-९६ मध्ये कडधान्य पीकाखालील क्षेत्र १७.९२ % आहे. अन्नधान्य पीकाखालील क्षेत्र ५८.९६% नगदी पीकाखालील क्षेत्र१.७७% आहे. फळे व भाजीपाला पीकाखालील क्षेत्र ०.९४% आहे. तेलबिया पीकाखालील क्षेत्र २०.४१%

२०००-२००१ मध्ये कडधान्य पीकाखालील क्षेत्र वाढून १८.१६% झाले. अन्नधान्य पीकाखालील क्षेत्रात घट होऊन ते ५५.९६% झाले. नगदी पीकाखालील क्षेत्रात वाढ झाली. ०२.१८% झाले. फळे व भाजीपाला पीकाखालील क्षेत्र १.००% झाले. तेलबिया पीकाखालील क्षेत्रात वाढ होऊन२२.७०% झाले. १९९५-९६ते २०००-२००१ या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यात अन्नधान्य पीकाखालील क्षेत्रात घट झाली.पण इतर सर्वच पीकाखालील क्षेत्रात वाढ झाल्याचे स्पष्ट होते.

२०००-२००१ ते२००५-२००६या कालावधीत कडधान्य पीकाखालील क्षेत्र१९.०३% झाले. अन्नधान्य पीकाखालील क्षेत्र५७.३४% झाले. नगदी पीकाखालील क्षेत्र३.१०% झाले. फळे व भाजीपाला पीकाखालील क्षेत्रात घट झाली.हे क्षेत्र ०.९२% होते.

उस्मानाबाद जिल्ह्यात२००५-०६ मध्ये फळे व भाजीपाला क्षेत्र कमी होण्याचे कारण म्हणजे या काळात पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. एवढेच काय या वेळी तेलबियाच्या पीकाखालील क्षेत्र घटल्याचे आढळते. सन २०१०-११ मध्ये कडधान्य पीकाखालील क्षेत्र२०.११% झाले. अन्नधान्य पीकाखालील क्षेत्र ६०.५१% झाले. नगदी पीकाखालील क्षेत्र४.३८% झाले. फळे व भाजीपाला पीकाखालील क्षेत्र०.९४% झाले. अर्थात १९९५-९६ मध्ये फळे व

 Copyright © 2020 Authors

भाजीपाला पीकाखालील क्षेत्र जेवढे तेवढेच क्षेत्र २०१०-११ मध्ये कायम राहिले. तेलबिया पीकाखालील क्षेत्रात कमालीची घट झाली आहे. २००५-२००६ ते २०१०-११ मध्ये तेलबिया पीकाखालील क्षेत्र फक्त १४.०६% होते.

सन१९९५-९६ ते २०१०-११ या पंधरा वर्षाच्या काळात उस्मानाबाद जिल्ह्यात कडधान्य पीकाखालील क्षेत्रात २.१९% वाढ झाली. अन्नधान्य पीकाखालील क्षेत्रात१.५५% वाढ झाली.

नगदी पीकाखालील क्षेत्रात २.६१% वाढ झाली. फळे व भाजीपाला पीकाखालील क्षेत्रात ना घट झाली ना वाढ झाली. १५ वर्षाच्या काळात आहे तेवढेच क्षेत्र राहिले. संशोधन काळात (१९९५-९६) ते२०१०-११ तेलबिया पीकाखालील क्षेत्रात कमालीची घट झालेली आहे. जिल्ह्यात तेलबिया पीकाखालील क्षेत्र ६.३५% कमी झाले. कारण पाण्याची टंचाई ,बीबीयानांचा अपुरा पुरवठा, विद्युत टंचाई, रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अपुऱ्या सुविधा ईत्यादी.

**निष्कर्ष :**

१. उस्मानाबाद जिल्ह्यातील पिक प्रारूपात बदल झाला आहे.

२. कडधान्य पीकाखालील क्षेत्रात, नगदी पीकाखालील क्षेत्रात विशेष वाढ झाल्याने उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कल अधिक आर्थिक उत्पन्न देणाऱ्या पिकाचे उत्पादन घेण्याकडे झाला आहे.

३. अन्नधान्य पीकाखालील क्षेत्रात वाढ झाली पण ती कमी आहे. फक्त १.१५ टक्क्ये क्षेत्र वाढले.

४. फळे व भाजीपाल्याचे पिक नाशवंत असल्यामुळे या पिकाच्या क्षेत्रात वाढ किवा घट झाली नाही.

५. तेलबिया पीकाखालील क्षेत्रात कमालीची घट झाली आहे.

**सारांश :**

उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृत्रिम जलसिंचनाच्या साधनाची सोय केल्यास जिल्ह्यातील बरेच क्षेत्र डोंगराळ आहे. तेथे वृक्षवर्गीय फळबागांची लागवड करण्यासाठी प्रोत्साहीत करणे. सेंद्रिय शेती संकल्पना रुजविणे. शेतकऱ्यांना भांडवल पुरवठा करणे. नियमित विजपुरवठा करणे. या गोष्टींची पूर्तता केल्यास जिल्ह्यात शेतीचा विकास होऊ शकतो.

**संदर्भ :**

१.माजीद हुसेन, कृषी भूगोल, रावत पब्लिकेशन, जयपूर
२.विठ्ठल घारपुरे (२०००) कृषी भूगोल, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर
३. उस्मानाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन(१९९५-९६) २०१०-११
४. कृषी अधिकारी अहवाल, कृषी विभाग, उस्मानाबाद विकिपीडिया
५. डॉ. शिरमाळे महेबूबपाशा, उस्मानाबाद जिल्ह्यातील विविध पिकाखालील क्षेत्र,एक भौगोलिक अभ्यास

 Copyright © 2020 Authors